# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./ ९० /२०२० - २१ दि. ०५ /०४/२०२१

## //परिपत्रक//

**वाचा**

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-2020/प्र.क्र.62/18 (र.व.का)**

कोविड-19 प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विविध अधिनियमांतर्गत विविध सक्षम प्राधिकरणांद्वारे घेण्यात येत असलेल्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या सुनावण्या तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्रथम अपिलावरील सुनावण्या सद्यास्थितीत बंद असल्याने त्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्रमांक PIL(L)3144/2020 (शैलेश गांधी व इतर विरुध्द मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन) मधील निर्णयानुसार शासनाने परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-2020/प्र.क्र.62/18 (र.व.का) निर्गमित केले असून त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणी घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खालील सुचनांचे पालन करावे.

1. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्रथम अपिलावरील सुनावण्या घेण्यासाठी व त्या संदर्भातील सर्व कामकाज (Proceedings) करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा वापर करावा. त्यामुळे सर्व पक्षकारांचे आरोग्य व सुरक्षा याबाबत कोणतीही तडजोड करावी लागणार नाही व जलद गतीने न्याय मिळणे सहज शक्य होईल.
2. तथापि, प्रथम अपिलाच्या अपिलकर्त्यांनी इंटरनेट सुविधेचा दर्जा, हार्डवेअरची अनुपलब्धता इ. स्वरुपाच्या तांत्रिक कारणास्तव व्यक्तीगत सुनावणीची विनंती केल्यास अशा अपिलकर्त्यांना व्यक्तिगत सुनावणीची संधी देण्यात यावी.

**(संभाजी वाघमारे)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**माहितीस्तव प्रत -**

मा. आयुक्त सो.

**कार्यवाहिकरिता -**

1)सर्व प्रथम अपिलीय अधिकारी

2) सर्व जनमाहिती अधिकारी

**सिस्टिम मॅनेजर -**

सर्व प्रथम अपिलीय अधिका-यांना झूम ॲपद्वारे प्रथम अपिलीय सुनावणीबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.